# शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद पालघर

Email Id : edu.palghar@gmail.com

जा.क्र./पाजिप/शिक्षण/प्राथ./आस्था/वशी- /२०२५/९८५ दिनांक-१५/०४/२०२५

## " प्रसिद्धीपत्रक "

**अनुसूचित जमाती व अन्य कोणत्याही प्रवर्गातील शिक्षक पदासाठी पात्रता धारण करणाऱ्या (शासनाने वेळोवेळी विहित केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हताप्राप्त) उमेदवारांना तात्पुरत्या कालावधीसाठी मानधन तत्वावर कंत्राटी पद्धतीने नियुक्तीने पदस्थापना देणेकरिता समुपदेशन प्रक्रिया राबविणेबाबत.**

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील दि.१५/०७/२०२४ रोजीचे शासन पत्रातील मुद्दा क्र. ३ नुसार अनुसूचित जमाती व अन्य कोणत्याही प्रवर्गातील शिक्षक पदासाठी पात्रता धारण करणाऱ्या ( शासनाने वेळोवेळी विहित केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हताप्राप्त) उमेदवारांना तात्पुरत्या कालावधीसाठी मानधन तत्वावर कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देणेकरिता शासन स्तरावरून शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील दि.१२/०२/२०२४ रोजीच्या पत्रानुसार मान्यता प्राप्त झाली असल्याने या कार्यालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरात जा.क्र./ पाजिप/शिक्षण/प्राथ./आस्था/वशी-५४६/ २०२४ /१२४६, दि.१४/०८/२०२४ अन्वये दि.२३/०८/२०२४ रोजीपर्यंत या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावातील कागदपत्रांची पडताळणी करून पडताळणीअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांना समुपदेशन पद्धतीने नियुक्ती देण्यात येणार आहे.

दिनांक ०८/०४/२०२५ रोजी विज्ञान/गणित विषयाच्या पदवीधर उमेदवारांचे समुपदेशन घेण्यात आले. सदर समुपदेशनास १३२ पैकी ९५ उमेदवार उपस्थित होते. अनुपस्थित असलेल्या ३७ उमेदवारांना भाषा व समाजशास्त्र विषयाचे समुपदेशन दिवशी एक अंतिम संधी देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**या प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या याद्या ह्या भाषा+भाषा/समाजशास्त्र आणि समाजशास्त्र+भाषा/समाजशास्त्र विषयधारक उमेदवारांची त्यांच्या TAIT परीक्षेतील गुणांच्या आधारे एकत्रितपणे तयार करण्यात आलेल्या आहेत.**

**तरी संबंधित उमेदवारांनी उपरोक्तप्रमाणे प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीचे अवलोकन करून काही आक्षेप असल्यास दि. १७/०४/२०२५ रोजीपर्यंत शिक्षण विभाग प्राथमिक, जिल्हा परिषद पालघर या कार्यालयास आवश्यक कागदपत्रांसह समक्ष उपस्थित राहून सादर करावेत. मुदतीनंतर येणारे आक्षेप कोणत्याही कारणास्तव स्वीकारले जाणार नाहीत, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

| अ.क्र. | गट | शेरा |
|---|---|---|
| १ | इ. १ ली ते ८ वी | **भाषा+भाषा/समाजशास्त्र आणि समाजशास्त्र+भाषा/समाजशास्त्र विषयाच्या समुपदेशनाची तारीख व वेळ यथावकाश स्वतंत्रपणे प्रसिद्धीपत्रक जाहीर करून कळविण्यात येईल.** |

(मनोज रानडे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

Scanned with CamScanner